**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान अपघातात निधन
- अजित पवारांच्या निधनाबद्दल देशभरातून शोक व्यक्त, राज्यात ३ दिवसांचा दुखवटा जाहीर
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला प्रारंभ

**आणि**

- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन दिशानिर्देशांना आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयाचा होकार

**<><><><><>**

राज्याचे उपमुख्यमंत्री, तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री, आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांचं आज विमान अपघातात निधन झालं. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या प्रचारसभांसाठी त्यांचं विशेष विमान बारामतीला उतरत असताना अपघातग्रस्त झालं आणि विमानातल्या सर्व ५ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव, वैमानिक सुमित कपूर, शांभवी पाठक आणि विमान कर्मचारी पिंकी माळी या ५ जणांचा समावेश आहे. अपघातस्थळी विमानानं थेट पेट घेतला. घटनास्थळाची पाहणी सुरू असून विमानाचा ब्लॅक बॉक्स, वैमानिकाचं संभाषण याची पडताळणी केल्यावर अपघाताचं कारण कळू शकेल, असं पोलिसांनी सांगितलं.

अजित पवार यांच्या कारकिर्दीचा थोडक्यात आढावा ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - व्हॉईस कास्ट- सुनील कांबळे - -**

*(राज्याच्या राजकारणात आणि कार्यकर्त्यांमध्ये 'दादा' या नावाने लोकप्रिय असलेल्या अजित आशा अनंतराव पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातल्या देवळाली प्रवरा इथं झाला. काका शरद पवार यांच्या मदतीनं १९८२ मध्ये साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आले आणि राजकारणात त्यांचा प्रवेश*

*झाला. दहाव्या लोकसभेत १९९१ मध्ये बारामती लोकसभा मतदारसंघातून ते खासदार म्हणून निवडून गेले. पण काही काळात त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला आणि नंतर ते राज्यातच रमले. दरवेळी बारामती विधानसभा मतदारसंघातून ते मोठ्या मताधिक्यानं विधानसभेत निवडून येत गेले.*

*विलासराव देशमुख, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस या मुख्यमंत्र्यांच्या काळात त्यांनी राज्याचं उपमुख्यमंत्रीपद भूषवलं आहे. राज्याचं अर्थमंत्रीपद भूषवणाऱ्या अजित पवारांनी आतापर्यंत तब्बल ११ वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्याशिवाय जलसंपदा, ऊर्जा, ग्रामविकास यासारखी खाती त्यांच्याकडे होती.*

*एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालच्या सरकारला एक वर्ष पूर्ण झाल्यावर विरोधी पक्षनेते असलेल्या अजित पवारांनी शरद पवारांच्या विरोधाला न जुमानता राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांना सोबत घेऊन सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आणि उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्षाचं नाव आणि पक्ष चिन्ह त्यांनाच मिळाले. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून सुप्रिया सुळे यांच्याविरोधात निवडणूक लढवली, पण त्यांना पराभव पत्करावा लागला. त्यानंतर राज्यसभेवर त्यांची नियुक्ती झाली.*

*पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचं अध्यक्षपद १६ वर्ष त्यांच्याकडे होतं. महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटना, महाराष्ट्र खोखो संघटना यांचेही ते दीर्घकाळ अध्यक्ष होते. याशिवाय विविध साखर कारखाने, सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.*

*स्पष्टवक्तेपणा, वक्तशीरपणा, कामाचा झपाटा, प्रशासन आणि लोकांशी असलेला थेट संपर्क यासाठी अजित पवार विशेष ओळखले जात. सकाळी ६ वाजता कामाला सुरुवात करुन लोकांचे प्रश्न सोडवणे, विविध ठिकाणच्या विकासकामांची पाहणी करणे ही त्यांच्या कामाची आणखी काही वैशिष्ट्यं. त्यामुळंच 'कामाचा माणूस' गेला या शब्दात सर्वत्र त्यांच्या निधनाविषयी हळहळ व्यक्त होत आहे.)*

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. पवार यांच्या निधनाने कधीही भरून न निघणारं

नुकसान झालं आहे, महाराष्ट्राच्या विकासासाठी ते सदैव स्मरणात राहतील असं राष्ट्रपती समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाल्या. त्यांनी पवार कुटुंबीय, त्यांचे समर्थक यांच्याबद्दल सहवेदना व्यक्त केल्या.

महाराष्ट्राच्या जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या अजित पवार यांच्याविषयी लोकांना अपार आदर होता, अशी भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. अजित पवार यांची प्रशासनावर जबरदस्त पकड होती, त्यांची नाळ जनसामान्यांशी घट्ट जोडलेली होती, असं प्रधानमंत्री म्हणाले.

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनीही अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. सहकार चळवळ आणि राज्याच्या विकासाच्या माध्यमातून ते जनतेच्या सदैव स्मरणात राहतील असं बिर्ला म्हणाले.

अजित पवार यांचं निधन आपल्यासाठी वैयक्तिक आणि रालोआसाठीही मोठं नुकसान आहे, अशी भावना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केली.

अजित पवार महाराष्ट्राचा विकास आणि समृद्धीसाठी वचनबद्ध होते, अशी प्रतिक्रिया संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचं वृत्त अतिशय धक्कादायक आणि दुर्दैवी असल्याची भावना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. त्यांचं प्रशासकीय कौशल्य, विकासाचा दृष्टिकोन आणि लोकांना जोडण्याची हातोटी यामुळे राज्याच्या राजकारणात त्यांचं स्थान नेहमीच अढळ राहिलं आहे, असं गडकरी म्हणाले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही पवार यांना श्रद्धांजली वाहिली.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. अजून मोठी राजकीय कारकीर्द पुढे असताना त्यांचं असं जाणं हे अकाली नुकसान आहे, अशी भावना खरगे यांनी व्यक्त केली. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अजित पवार यांचं निधन अत्यंत वेदनादायक आहे, अशी भावना व्यक्त केली. या दुःखद प्रसंगी आपण महाराष्ट्राच्या जनतेसोबत असून पवार कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करतो असं गांधी म्हणाले. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनीही अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**//<><><><><>//**

अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे महाराष्ट्र सुन्न झाला आहे. बारामती इथं त्यांच्या शोकाकुलअनुयायी, कार्यकर्ते आणि चाहत्यांची प्रचंड गर्दी झाली आहे. राज्यात शासनानं तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला असून आज सार्वत्रिक सुट्टी जाहीर केली आहे.

महाराष्ट्राचे **राज्यपाल** आचार्य देवव्रत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. पवार यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि समर्थकांना हे दुःख सहन करण्याचं धैर्य मिळो अशी प्रार्थना त्यांनी केली.

अजित पवार यांच्या जाण्याने एक दिलदार मित्र गमावल्याची भावना **मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. त्यांच्या निधनाच्या वृत्तावर विश्वास ठेवणं कठीण आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेले, राज्याच्या प्रश्नांची जाण असणारे ते संघर्षशील नेते होते, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

**- - - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -**

अजित पवार यांच्या जाण्यानं मोठा भाऊ गेल्याची आपली भावना आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ **शिंदे** म्हणाले. एक दूरदर्शी, स्पष्टवक्ता आणि अभ्यासू नेता आपण गमावला, असं शिंदे म्हणाले.

**- - होल्ड बाईट शिंदे - - -**

केंद्रीय मंत्री **पीयूष गोयल** यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं. तर महाराष्ट्राच्या पुरोगामी गडाचा एक खंबीर बुरूज कोसळल्याची भावना केंद्रीय मंत्री **रामदास आठवले** यांनी व्यक्त केली. मनसे अध्यक्ष **राज ठाकरे** यांनी अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्रानं एक उमदा नेता गमावला असं म्हटलं आहे. माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनीही पवार कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त केल्या आहेत. अजित पवार यांच्या निधनाचं वृत्त अविश्वसनीय असल्याची भावना काँग्रेस नेते नाना पटोले यांनी व्यक्त केली. तर महाराष्ट्रानं एक उत्तम प्रशासक आणि लोकप्रिय नेता गमावल्याची भावना माजी मंत्री जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष **हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार,** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते डॉ. **डी एल कराड** यांनीही अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केल्या.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकलपीय अधिवेशनाला आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने प्रारंभ झाला. संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर केलेल्या अभिभाषणात राष्ट्रपतींनी विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी सामूहिक निर्धाराची गरज असल्याचं सांगितलं. संसदेतल्या सर्व सदस्यांनी राष्ट्रहिताच्या प्रश्नांवर सरकारला साथ द्यावी असं आवाहन त्यांनी केलं. सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात २५ कोटी जनतेला दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यात सरकारला यश मिळाल्याचं त्या म्हणाल्या.

\- **- होल्ड - राष्ट्रपती बाइट - - -**

यावेळी राष्ट्रपतींनी गेल्या वर्षभरातल्या सरकारच्या कार्याचा आढावा घेताना कृषी उत्पादनात झालेली मोठी वाढ, नवीन कामगार कायदे, नौकानयन क्षेत्रातल्या जुन्या कायद्यांमधले बदल, नक्षलवाद उच्चाटनातली प्रगती, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात ३५ लाखाहून अधिक रोजगार निर्मिती, इत्यादी ठळक मुद्द्यांचा उल्लेख केला. याशिवाय भगवान गौतम बुद्ध यांचे अवशेष परत आणण्यात सरकारला मिळालेलं यश, सोमनाथ मंदिर सोमनाथ स्वाभिमान पर्व, प्राचीन हस्तलिखितांचं डिजीटलीकरण, छत्तीसगढ स्वतंत्रता सेनानी संग्रहालय, संविधानाचा संथाली भाषेत अनुवाद, दिवाळीच्या सणाला युनेस्कोने दिलेला जागतिक वारशाचा दर्जा, इत्यादी मुद्द्यांचाही त्यांनी उल्लेख केला. ऑपरेशन सिंदूरद्वारे भारतीयांचं शौर्य आणि शक्तीचा सुजाण वापर जगाने पाहिला असं राष्ट्रपती म्हणाल्या.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी लोकसभेत सादर करतील. हा त्यांचा सलग नववा अर्थसंकल्प आहे. अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या १३ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून त्यात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावर चर्चा होईल. दुसरा टप्पा ९ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत होईल

**<><><><><>**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन दिशानिर्देशांना आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयाने होकार दिला आहे. जातिआधारित भेदभाव या संकल्पनेची व्याख्या या दिशानिर्देशांमधे स्पष्ट केलेली नाही, असं याचिकाकर्त्यांचं म्हणणं आहे. उच्च शिक्षण संस्थांमधे जातिआधारित भेदभाव होऊ नये याकरता विशेष

उपाययोजना कराव्या असं सांगणारे दिशा निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकतेच जारी केले आहेत.

**//<><><><><>//**